# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून खैरवाडीमध्ये साकारला पुल; पुलामुळे आदिवासी बांधवांना मिळाला दिलासा

पनवेल (प्रतिनिधी) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून २६ लाख ७४ हजार रूपये खर्च करून पनवेल तालुक्यामधील दुंदरे विभागातील खैरवाडी येथिल जोड रस्त्यावर बांधण्यात आलेल्या पुलाचे उदघाटन सोमवारी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सदस्य व तालुका कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थित झाले असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे साकारलेल्या या पुलामुळे या परिसरातील आदिवासी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून खैरवाडी तसेच परिसरातील इतर गाव व वाडीवस्तीमध्ये जाण्याकरिता येथील आदिवासी बांधव ग्रामस्थांना नदीच्या पात्रातील बंधाऱ्याचा आधार घेवून जावे लागत होते. अरूंद व कमी उंचीच्या बंधाऱ्यामुळे पावसाळयामध्ये काही लोकांना जीव गमवावे लागले आहे. याची दक्षता घेवून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाकडे पाठपुरावा करून खैरवाडी जोडरस्त्यावर पूल साकारले. यामुळे खैरवाडी सोबतच फणसवाडी, गारमाळ, तामसई व इतर वाडीवस्तीतील लोकांना याचा फायदा झाला होवून त्यांचा इतर गावांशी संपर्क वाढला असून त्यावद्दल येथील आदिवासी बंधू-भगिनींनी आमदार प्रशांत ठाकूर यांना धन्यवाद देत आभार व्यक्त केले.

या पुलाच्या उदघाटन कार्यक्रमास महिला कॉंग्रेसच्या पनवेल तालुका अध्यक्ष ॲड.आशा भगत, उपाध्यक्षा समिना साठी, पनवेल विधानासभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, सरपंच वनिता कातकरी, उपसरपंच हिरामण खैर, वांगणी तर्फे वाजे जि.प.विभागीय अध्यक्ष सुनिल पाटील, शिरवली विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे, दुंदरे पं.स.विभागीय अध्यक्ष बाळाराम ऊसाटकर, जिल्हा परिषद विभागीय उपाध्यक्ष बळीशेठ फडके, युवा अध्यक्ष महेंद्र माळी, ज्येष्ठ कार्यकर्ते धार्माशेठ भोपी, गुलाबशेठ भोपी, वासुदेव गवते, माजी सरपंच रामदास म्हात्रे, बुधाजी खैर, रामदास कातकरी, वांगणी तर्फे वाजे महिला अध्यक्षा वंदना भोपी, कामोठे शहर अध्यक्षा दिक्षा जगताप, प्रमिला जाधव, महादेव गडगे, रामदास फडके, परशुराम शिंदे, आत्माराम दिसले, हनुमान खैर, श्रीराम बडेकर, रामदास शिंदे, गोपाळ सकपाळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक उपस्थित होते.